**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 02.05.2025** **वार-शुक्रवार**

---

**आयुका**

पुणे जिल्हा परिषदेनं ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय विज्ञानाची गोडी लागावी, यासाठी 'आयुका' अंतरिक्ष संशोधन संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळं जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता सहावी आणि सातवीचे विद्यार्थी खगोल विज्ञान आणि खगोल भौतिकीचे धडे गिरवणार आहेत. तसंच हे विद्यार्थी भारतीय अंतराळ संशोधन संस्था आणि अमेरिकेतील नासा या संशोधन संस्थांनाही भेट देऊ शकणार आहेत. या सामंजस्य करारावर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि 'आयुका'चे संचालक प्राध्यापक रघुनाथन श्रीआनंद यांनी स्वाक्षरी केली. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळांतील इयत्ता सहावी आणि सातवीच्या वर्गातील ७५ विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांना खगोल विज्ञान आणि खगोल भौतिकीचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे. यापैकी ५० विद्यार्थ्यांना 'इस्त्रो' इथं शैक्षणिक भेटीसाठी आणि २५ विद्यार्थ्यांना 'नासा' इथं अभ्यास दौऱ्यासाठी पाठविलं जाणार आहे.

**ई-लर्निंग**

पुणे महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती मिळावी, तसंच शिक्षणामध्ये त्याचा वापर व्हावा, यासाठी महापालिकेनं उभारलेली 'ई-लर्निंग यंत्रणा' बंद पडली आहे. महापालिकेची प्रत्येक शाळा ऑनलाइन पद्धतीनं जोडली जावी, यासाठी महापालिकेनं ई-लर्निंग यंत्रणा उभारली होती. यासाठी सुमारे २० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सध्या ही यंत्रणा बंद असल्याची माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी दिली.

**आयुष्मान**

प्रधानमंत्री आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेचा राज्यात गेल्या तीन वर्षांत सुमारे 17 लाख रुग्णांनी मोफत उपचारांचा लाभ घेतला आहे. मात्र, ही योजना राबविताना शासकीय रुग्णालयांची उदासीनता, खासगी रुग्णालयांची मनमानी आणि शासनाकडून निधी मिळण्यास होणारा विलंब, अशी आव्हानं निर्माण झाल्याचं निदर्शनास येत आहे. धर्मादाय रुग्णालयांनी यापुढं रुग्णाला तातडीनं भरती करून उपचार सुरू करावेत. रुग्णाला मोफत उपचारांपासून वंचित ठेवल्याचं निदर्शनास आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे अशी माहिती आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉक्टर ओमप्रकाश शेटे यांनी दिली आहे. राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यात आत्तापर्यंत 1 कोटी 60 लाखांहून अधिक लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड मिळवलं असून, सुमारे 35 लाख रुग्णांनी मोफत उपचाराचा लाभ घेतला आहे. सध्या राज्यातील 2 हजार 31 रुग्णालयांमध्ये योजना कार्यान्वित आहे.

**सत्कार**

पुण्याच्या गांधर्व महाविद्यालयाच्या 93व्या वर्धापन दिनानिमित्त पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर स्मृती गुरू गौरव पुरस्कारानं शास्त्रीय गायिका, गुरू आणि बंदिशरचनाकार डॉक्टर माधुरी डोंगरे सन्मान यांचा सन्मान करण्यात आला. निर्गुण निराकार रागांची उपासना करणं अवघड आहे. बंदिशींच्या माध्यमातून या रागांची सगुण साकार मूर्ती तयार होते अशी भावना डोंगरे यांनी व्यक्त केली. वर्धापन दिनानिमित्त प्राचार्य पंडित प्रमोद मराठे यांनी महाविद्यालयाला दोन लाख रुपयांची देणगी जाहीर केली. तसंच गुरुकुलातील विद्यार्थ्यांना संवादिनी भेट दिली.

**सीएसआर**

पाणी बचतीसह आरोग्य, पर्यावरणीय उपक्रम तसंच कौशल्य विकासातून सामाजिक वृद्धी, महिलाचं सशक्तीकरण आणि आदिवासी आश्रमशाळा अशा सामाजिक उपक्रमांसाठी भरीव योगदान देणाऱ्या अमानोरा येस फाऊंडेशनचा रोटरी इंटरनॅशलन डिस्ट्रिक्ट 3131च्या वतीनं सीएसआर पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांनी पुरस्कार स्वीकारला.

**पुल**

कोणतीही पूर्वसूचना न देता सोमवारी पुण्यातील राजाराम पूल अचानक बंद केल्यानं नागरिकांना प्रचंड वाहतूक कोंडीत अडकून पडावं लागलं. यावरून पुणे महापालिकेनं हा पूल बंद करणाऱ्या ठेकेदाराला कारणं दाखवा नोटीस पाठवून तीन दिवसात याचा खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

**साहित्य**

जागतिक कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल आणि झोपडपट्टी सुरक्षा दल या संघटनेच्या वतीनं उपेक्षित वर्गावर साहित्य लिहिणाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. तर कामगार नेते राजन नायर यांना नारायण लोखंडे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. ही सृष्टी कामगारांच्या कष्टावर उभी राहिली आहे. कामगार हा जगाचा निर्माता आहे अशी भावना सबनीस यांनी पुरस्काराला उत्तर देताना व्यक्त केली.

**आयोजन**

महाराष्ट्र कर व्यवसायिक संघटनेच्या वतीनं 'अमृत ज्ञानकुंभ या दोन दिवसांच्या राष्ट्रीय कर परिषदेचं आयोजन उद्यापासून पुण्यात करण्यात आलं आहे. 'कर सल्लागार: पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ' अशी या राष्ट्रीय कर परिषदेची संकल्पना आहे अशी माहिती राष्ट्रीय कर परिषदेचे अध्यक्ष नरेंद्र सोनवणे यांनी दिली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**